अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील आज सोलापुरात



**सोलापूर** : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे रविवार, ३१ डिसेंबर रोजी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ७ वाजता संभाजी नगर येथून शासकीय वाहनाने सोलापूरकडे रवाना होणार आहेत. रविवारी दिवसभर सोलापूर शहर व ग्रामीण परिसरातील कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत.

सायंकाळी साडे सहा दरम्यान ते शासकीय वाहनाने कोल्हापूरकडे रवाना होणार आहेत. सकाळी ९.३० दरम्यान पालकमंत्री पंढरपूर येथील पंडित प्रदीप मिश्रा यांच्या श्री हरिहर शिव महापुराण कथा कार्यक्रमाला हजेरी लावणार आहेत. त्यानंतर, ११.३० वाजता श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे दर्शन घेणार आहेत. दुपारी १ दरम्यान जिल्हा नियोजन समिती निधीतून कासेगाव येथे केलेल्या वनविभागाच्या विविध विकास कामांची पाहणी करणार आहेत. त्यानंतर पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावात डीपीसी निधीतून केलेल्या विविध कामांची पाहणी करणार आहेत. त्यानंतर मंगळवेढा तालुक्यातील मौजे दमाजी नगर येथील विविध कामांची पाहणी करणार आहेत. पावणे पाच दरम्यान पालकमंत्री सोलापूरकडे रवाना होणार आहेत. साडे पाच दरम्यान विजापूर रोड येथील आयोजित लोकमंगल फाउंडेशनच्या सामुदायिक विवाह सोहळ्याला हजेरी लावणार आहेत. त्यानंतर साडे सहा दरम्यान कोल्हापूरकडे रवाना होणार आहेत.

www.surajyadigital.com | रविवार, दि.३१ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ८२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# आय एम द ‘बॉस’

## रश्मी शुक्ला बनल्या पोलीस महासंचालक

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राजकारण्यांचे स्टार कधी उजळतील,याचा नेम नाही. अगदी तसेच सनदी अधिकारी आणि आयपीएस अधिकारी हे कधी लकी ठरतील हे देवही सांगू शकत नाही. सत्तेतल्या पुरूष प्रधानकीचा त्रास सहन करत पोलीस दलातील वरिष्ठ महिला अधिकारी रश्मी शुक्ला यांनी ‘सत्य मेव जयते’चा आदर्श राज्यापुढे ठेवत पोलीस महासंचालकपदाचा सर्वोच्च बहुमान मिळवला.इतक्या मोठ्या पदावर जाणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून राज्याच्या पोलीस दलात उत्सुकता लागून असलेल्या पोलीस महासंचालक पदावर शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे खाकीवर्दीच्या त्या बॉस झाल्या आहेत.**

राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश शेठ ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत. शेठ यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे नवे अध्यक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या पोलीस महासंचलाकपदासाठी कोणाची नियुक्ती करावी? यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात बैठक झाली. त्यात शुक्लांना महासंचालक बनवण्याचे ठरले होते.त्यानुसार त्यांच्या नावावर शनिवारी मोहोर उठवण्यात आली.

शुक्ला या १९८८ च्या बॅचच्या आहेत. त्यांनी महाराष्ट्र संवर्गीय अधिकारी सीमा बलचे महासंचालक म्हणून काम केले आहे. तसेच, सेंट्रल रिझर्व पोलीस दलाच्या अतिरिक्त महासंचालक म्हणूनही काम केले होते. केंद्रीय प्रतिनियुक्तीवर पोस्ट करण्यापूर्वी शुक्ला यांनी पुणे पोलीस आयुक्त आणि राज्य गुप्तचर विंगचे संचालक म्हणून काम करण्यासह महाराष्ट्रात अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत.

फोन टॅपिंग प्रकरणात त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला होता. त्यानंतर त्यांना सरकारनं क्लीनचीट दिली होती. त्यामुळं आगामी लोकसभा निवडणुकीच्या आधीच त्यांची पोलिसांच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आल्याने नव्या चर्चेला उधाण आले आहे. फडणवीस गृहमंत्री असताना विरोधी नेत्यांचे फोन कॉल्स बेकायदेशीरपणे रेकॉर्ड करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर झाला होता. या फोन टॅपिंग प्रकरणाची जबाबदारी राज्य गुप्तचर विभाग प्रमुख या नात्याने शुक्ला यांच्यावर दोन एफआयआर नोंदवण्यात आल्या होत्या. यांपैकी एक एफआयआर पुण्यात तर दुसरी मुंबईतील कुलाबा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना हे दोन्ही एफआयआर नोंदवण्यात आले होते. हे दोन्ही एफआयआर मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार नोंदवण्यात आले होते. पुण्यात काँग्रेस नेते नाना पटोले तर मुंबईत संजय राऊत आणि एकनाथ खडसे यांचे फोन रेकॉर्ड करण्यात आले होते,अशी तक्रार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली होती.शुक्ला ह्या भाजपच्या एजंट आहेत,असेही आरोप या नेत्यांनी केले होते.

दरम्यान, पुणे फोन टॅपिंग प्रकरणात फिर्यादीद्वारे क्लोजर रिपोर्ट दाखल करण्यात आला होता. तर दुसरीकडं, कुलाबा प्रकरणी शुक्ला यांच्यावर खटला चालवण्यास राज्य सरकारने मंजुरी देण्यास नकार दिला होता.



**अशी आहे कारकीर्द :** हैद्राबादच्या नॅशनल पोलीस अकॅडमीतून पास आउट झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र कॅडर जॉइन केले. राज्यात विविध ठिकाणी काम केल्यानंतर त्यांनी महिलांविरोधात होणाऱ्या अत्याचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी काम सुरू केले. ईटी ह्युमन फोरमच्या मोहितीनुसार त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यात महिलांसाठी समुपदेशन केंद्र सुरू केले. नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारमध्ये कोऑर्डिनेटर म्हणून काम केले होते. २०१६ मध्ये शुक्ला यांची पुण्याच्या पोलीस आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली होती. २०१८ पर्यंत त्या पुण्याच्या पोलीस आयुक्त होत्या. फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१८ मध्ये रश्मी शुक्ला यांची राज्य गुप्तचर विभागाच्या आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली होती. रश्मी शुक्ला यांना २००४ साली चांगल्या कामगिरीसाठी पोलीस महासंचालक पदक, २००५ मध्ये उत्कृष्ठ सेवेसाठी राष्ट्रपती पदक आण् २०13 मध्ये पोलीस मेडल मिळाले आहे.

### पुरुषप्रधानकीचा त्रास

राज्यात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात जेव्हा महाविकास आघाडीचे सरकार आले,तेव्हा रश्मी शुक्लांची २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या काळातील कथित फोन टॅपिंग प्रकरणी आघाडी सरकारने चौकशी सुरू केली होती. एकनाथ खडसे, संजय राऊत, नाना पटोले, आशिष देशमुख आणि बच्चू कडू यांचे फोन टॅप करण्यात आल्याची माहिती तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी विधानसभेत देखील केली होती. त्या दरम्यानच्या काळात रश्मी शुक्ला या प्रतिनियुक्तीवर सीआरपीएफ रुजू झाल्या होत्या.राजकारणी लोक कुठल्या अधिकाऱ्याला आडवे करतील हे सांगता येत नाही.चौकशी लावल्याने शुक्ला ह्या तणावाखाली आल्या होत्या. आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकार जेव्हा सत्तेत आले,तेव्हा फोन टॅपिंगच्या प्रकरणातील त्यांच्या विरोधातील चौकशी बंद झाली होती. मुंबई हायकोर्टाने शुक्लांच्या विरोधातील फोन टॅपिंग प्रकरणातील याचिका फेटाळून लावल्या होत्या. त्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विश्वासातील असल्याची टीका विरोधकांकडून केली गेली.राजकीय आव्हानांवर मात करून त्यांनी सर्वोच्च बहुमान मिळवला.

### सोलापूरकर कसे विसरतील...

राज्यात १९९५मध्ये पहिल्यांदाच सत्तांतर होवून भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले.त्यावेळी शुक्ला ह्या सोलापूर शहर पोलीस दलात उपायुक्त म्हणून कार्यरत होत्या.प्रशासनावर वचक होता. त्यावेळचा एक प्रसंग सांगता येईल.मुख्यमंत्री झाल्यानंतर मनोहर जोशी हे पहिल्यांदाच सोलापूर येत होते.विमानतळावर आमदार,पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची त्यांच्या स्वागताला गर्दी झाली होती.सर्वजण पुढे पुढे करत होते.शुक्ला मॅडम ह्या हातात छडी घेवून जेव्हा शांतपणे राऊंड घ्यायला सुरूवात केली, तेव्हा सारेजण चिडीचूप होवून रांगेत उभे राहिले.

---

होस्पेट बसस्थानकातील चोरीच्या तपासासाठी

## कर्नाटक पोलिसांची माढा तालुक्यात शोधमोहीम

सुराज्य/सोलापूर

आंध्रप्रदेशमधील सराफाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली सुमारे १ कोटी ६५ लाख ९० हजारांचा ऐवज असलेली बॅग चोरट्यांनी कर्नाटक येथील होस्पेट बसस्थानकातून दि.२२ ऑक्टोबर २०२३ रोजी चोरून नेली होती. चोरट्यांच्या शोधात कर्नाटकचे पोलीस पथकासह माढा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ठाण मांडून आहेत.

फिर्यादी सोने व्यापारी शेख हजमल (रा.खंड्रिगा, तातापल्ली मंडलम, नेल्लोर, आंध्र प्रदेश) हे हॉस्पेट (कर्नाटक) येथे सोनेखरेदीसाठी गेले होते. खरेदीनंतर गंगावतीकडे विक्रीसाठी सकाळी ९ वाजता हॉस्पेट येथे बसस्थानकावर बसची वाट पाहत होते. यावेळी एक केएसआरटीसी (कर्नाटक परिवहन महामंडळ) बस आली. फिर्यादी शेख हजमल व त्याचा मोठा भाऊ शेख शकिल बॅग घेऊन बसमध्ये चढले. त्यांनी बॅग बसच्या रॅकवरील सीटच्या वर ठेवली असता काही चोरट्यांच्या हे लक्षात आले. त्यांनी दागिने व रोख रक्कम असलेली बॅग चोरून नेली.

### तीन किलो सोने व रोख रक्कम

बॅगेमध्ये १ कोटी ६१ लाख ८५ हजारांचे सुमारे ३ किलो २३७ ग्रॅम वजनाचे, ११२ विविध पॅटर्नचे दागिने व दागिने विकून आलेली रोख रक्कम ४ लाख ५ हजार असा एकूण १ कोटी ६५ लाख ९० हजारांचा ऐवज होता.

### ठाण मांडूनही यश नाही

चोरीप्रकरणी संशयित राजा राम डिकोळे याच्यावर गुन्हा दाखल आहे. संशयित व त्याच्या इतर साथीदारांचा तपास करताना कर्नाटक पोलिस आपल्या पथकासह सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे काही दिवसांपासून ठाण मांडून आहेत. मात्र त्यांना अद्याप यश आले नाही.

---

## सराईत गुन्हेगार संदीप चव्हाण स्थानबध्द

सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार संदीप प्रल्हाद चव्हाण यास एम पी डी ए कायद्यान्वये स्थानबद्ध करून त्याची पुणे येथील येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली.पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी पोलीस आयुक्तालयाचा पदभार स्वीकारल्यापासून ही १९ वी तर या वर्षातील १५ वी कारवाई असल्याचे माहिती कक्षातून सांगण्यात आले.

सोलापूर शहरातील घरफोडीसह अन्य गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार संदीप प्रल्हाद चव्हाण (वय - ३८,रा,पारधी वस्ती, मुळेगांव, हल्ली रेणुका नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) याच्याविरुद्ध एमआयडीसी,जोडभावी पेठ आणि सलगर वस्ती पोलीस ठाण्याच्या दप्तरी अनेक दाखल आहेत. संदीप चव्हाण हा मागील काही वर्षांपासून सातत्याने घातक शस्त्राचा वापर करुन जबरी चोरी, घरफोडी, गैरकायद्याची मंडळी जमविणे, दुखापत करणे, खंडणी मागणे आणि धमकी देणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने, अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करीत आला आहे.



संदिप चव्हाण याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे, त्याची सोलापुर शहरातील व्यापारी व सामान्य नागरीकांमध्ये दहशत असून, त्याच्याविरुध्द सामान्य नागरीक उघडपणे पोलीसांना माहीती देत नाहीत.

त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी तडिपाराची कारवाई केली होती. त्यानंतरही त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल अशी वरीलप्रमाणे गुन्हेगारी कृत्य चालू ठेवली. त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी, पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी, शुक्रवारी २९ डिसेंबर रोजी त्याच्याविरुद्ध एमपीडीए अधिनियम, १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबध्दतेचे आदेश निर्गमित करुन, त्यास शनिवारी, ३० डिसेंबर रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करुन, त्यास येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल केले. ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उप-आयुक्त डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, प्रांजली सोनवणे, डॉ. संतोष गायकवाड, सुनिल दोरगे, अश्विनी भोसले, विर्शेद्रसिंग बायस व एमपीडीए पथकातील अंमलदार पोहेकॉ. विनायक संगमवार, पोहेकॉ. सुदीप शिंदे, पोशि.अक्षय जाधव, पोशि.विशाल नवले यांनी पार पाडली.

---

## अभियांत्रिकी तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शेळगी परिसरातील बसवेश्वर चौकाजवळ शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे.

राजेश्वरी राजशेखर कोळी (वय-१९, शेळगी, बसवेश्वर चौकाजवळ) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास तिचा मृतदेह घराच्या हॉलमधील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ती इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होती. तिच्या पश्चात आई-वडील, एक बहीण आणि एक भाऊ असा परिवार आहे. तिचे आई-वडील शिक्षक आहेत. सोमवारी परीक्षा असल्याने त्याचा टेन्शन घेऊन तिने हा प्रकार केला. असा अंदाज व्यक्त केला जात आहे. जोडभावी पेठ पोलिसात नोंद झाली. तपास हवालदार साळुंखे करीत आहेत.

---

## भीमा कोरेगाव दंगल प्रकरणी; गौतम नवलखा यांची चौकशी?

सुराज्य/नवी मुंबई

पुणे-भीमा कोरेगाव दंगल प्रकरणी नजर कैदेत असणारे गौतम नवलखा हे पुन्हा प्रकाश झोतात आले आहेत. दिल्ली पोलिसांनी काही प्रकरणाची त्यांची झाडाझडती घेतली. मात्र नेमकी कशाची चौकशी केली याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली आहे.

१ जानेवारी २०१८ मध्ये भीमा कोरेगाव युद्धाला दोनशे वर्षे झाल्याच्या निमित्ताने मोठ्या संख्येने लोक जमा झाले होते. मात्र या ठिकाणी अचानक दंगल उसळली. त्या प्रकरणाची अद्याप चौकशी सुरू आहे. या प्रकरणात अनेकांना अटक झाली त्या पैकीच एक पत्रकार असलेले गौतम नवलखा हे आहेत. त्यांनी या घटनेनंतर झालेले आरोप फेटाळले होते. मात्र २०२० मध्ये राष्ट्रीय सुरक्षा समिती समोर त्यांनी शरणागती पत्करली.



तेव्हापासून ते नवी मुंबई सीबीडी येथे ते न्यायालयाच्या आदेशाने नजरकैदेत आहेत. मात्र आज अचानक दिल्ली पोलीस या ठिकाणी धडकले व त्यांनी नवलखा यांची चौकशी सुरू केली. आज दिवसभर नवलखा यांच्याशी दिल्ली पोलिसांनी अनेक बाबतीत चौकशी केली मात्र त्याचा तपशील समजू शकला नाही.

---

## एसआरपीएफ कॅम्पमध्ये तरुणाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

एका २१ वर्षीय तरुणाने राहत्या घरातील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोरेगाव येथील एसआरपीएफ कॅम्पमधील पोलीस वसाहतीत आज शनिवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.

अभिषेक महालिंग भोसले (वय २१) असे मयताचे नाव आहे.त्याचे वडील एसआरपीएफ मध्ये बार्बर म्हणून कार्यरत आहेत. आज सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास अभिषेक याने घरामध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत अभिषेक याच्या पश्चात आई-वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




ते आज कोणताच कॉल घेणार नाहीत !

कल्याण
135-97-250

---

# देशात आयकर भरणाऱ्यांची संख्या वाढली

## प्रथमच टप्पा गाठला

सुराज्य/नवी दिल्ली

**२०२३ हे वर्ष संपायला अवघे एकच दिवस बाकी आहे. त्यापूर्वीच केंद्र सरकारसाठी दिलासादायक बातमी मिळाली आहे. आयकर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मूल्यांकन वर्ष २०२३ ते २४ साठी आतापर्यंत ८ कोटीहून अधिक लोकांनी आयकर रिटर्न भरला आहे. आयकर विभागाने ट्वीटरवद्वारे याबाबतची माहिती दिली आहे. अर्थ मंत्रालयाने प्रथमच हा टप्पा गाठला आहे.**

लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सांगितले होते की, गेल्या पाच वर्षांत आयकर रिटर्न भरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. मंत्र्यांच्या उत्तरानुसार, २०१८-१९ मध्ये आयटीआर फाइल करणाऱ्यांची संख्या ६.२८ कोटींवरून २०१९-२० मध्ये ६.४७ कोटी आणि २०२०-२१ मध्ये ६.७२ कोटी झाली. २०२१-२२ या आर्थिक वर्षात दाखल केलेल्या आयटीआरची संख्या ६.९४ कोटींहून अधिक आणि २०२२-२३ मध्ये ७.४० कोटींहून अधिक झाली आहे.




गेल्या चार वर्षांत, शून्य कर दायित्वासह आयटी रिटर्नची संख्या आर्थिक वर्ष २०१९-२० मधील २.९० कोटींवरून २०२२-२३ मध्ये ५.१६ कोटी झाली आहे. भारत सरकारला नोव्हेंबर २०२३ पर्यंत १७ लाख ४५ हजार ५८३ कोटी रुपये मिळाले आहेत. यामध्ये १४ लाख ३५ हजार ७५५ कोटी रुपयांचा कर महसूल (केंद्राला मिळणाऱ्या निव्वळ), २ लाख ८४ हजार ३६५ कोटी रुपयांचा गैर-कर महसूल आणि २५ हजार ४६३ कोटी रुपयांच्या कर्ज-विरहित भांडवली पावत्यांचा समावेश आहे.

**आयकर भरणाऱ्यांची संख्या वाढली :** अर्थ मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टमध्ये लिहिले आहे की- यापूर्वी, करदात्यांनी मूल्यांकन वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण ७ कोटी ५१ लाख ६० हजार ८१७ आयटीआर सादर केले होते. सरकारने सभागृहात २०२२-२३ या आर्थिक वर्षाची माहिती देताना ७.४० कोटींहून अधिक लोकांनी इन्कम टॅक्स रिटर्न भरल्याचे म्हटले होते.

**आयटीआर म्हणजे काय? :** आयटीआर म्हणजेच आयकर रिटर्न हा करदात्यांनी भारतीय प्राप्तिकर विभागाला त्यांचे उत्पन्न आणि मालमत्तेचा अहवाल देण्यासाठी वापरला जाणारा कर रिटर्न फॉर्म आहे. यामध्ये करदात्यांच्या वैयक्तिक आणि आर्थिक डेटाशी संबंधित तपशील असतो. आयटीआर बहुतेक इलेक्ट्रॉनिक मोडमध्ये दाखल केला जातो. परंतु ज्येष्ठ नागरिकांसाठी ते मॅन्युअली फाइल करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. करदाता एक व्यक्ती, फर्म, ट्रस्ट, कंपनी किंवा समाज असू शकतो. आयकर भरताना व्यक्तीला कोणतेही कागदपत्र जोडावे लागत नाही. जेव्हा करदात्याने दाखल केलेला खढ्ठ आधार मोबाईल नंबर किंवा इंटरनेट बँकिंग वापरून तयार केलेल्या ओटीपी द्वारे ई-पडताळणी केली जाते तेव्हा प्रक्रिया पूर्ण होते.

**या लोकांना आयकरातून सूट :** १. जर एखाद्या व्यक्तीचे वय ६० वर्षांपेक्षा कमी असेल आणि त्याचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपये असेल तर अशा व्यक्तीला कोणताही कर भरावा लागणार नाही. या आकड्याची मर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तीला आयटीआर दाखल करावा लागेल. २. जर एखाद्या व्यक्तीचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त आणि ८० वर्षांपेक्षा कमी असेल आणि वार्षिक उत्पन्न ३ लाख असेल तर त्या व्यक्तीलाही कराच्या कक्षेतून बाहेर ठेवले जाईल.